आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२८ ऑगस्ट २०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राष्ट्रीय औद्योगिक कॉरिडॉर विकास कार्यक्रमाअंतर्गत बारा नव्या ग्रीनफील्ड औद्योगिक स्मार्ट सिटी प्रकल्पांना केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी/ कृषी पायाभूत सुविधा निधीचा विस्तार करण्याचा निर्णय
- प्रधानमंत्री जनधन योजनेला दहा वर्षे पूर्ण/ प्रधानमंत्र्यांनी केलं लाभार्थ्यांचं अभिनंदन
- मालवण राजकोट इथं छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा पडल्याच्या निषेध मोर्चादरम्यान तणाव, येत्या रविवारी महाविकास आघाडीतर्फे गेट वे ऑफ इंडियावर आंदोलन
- राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीचा सार्वकालिक उच्चांकाला स्पर्श, चढ-उतारानंतर दिवसअखेर दोन्ही बाजारांच्या निर्देशांकांमध्ये किरकोळ वाढ

**आणि**

- पॅरिस पॅरालिंपिक स्पर्धेला आजपासून प्रारंभ

**<><><><><>**

राष्ट्रीय औद्योगिक कॉरिडॉर विकास कार्यक्रमा अंतर्गत बारा नव्या ग्रीनफील्ड औद्योगिक स्मार्ट सिटींना केंद्रीय मंत्रिमंडळानं आज मंजुरी दिली. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी नवी दिल्लीत बातमीदारांना ही माहिती दिली. यासाठी अंदाजे २८ हजार ६०२ कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाणार आहे. यामुळे दहा लाख थेट आणि ३० लाख अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होईल, असं वैष्णव यांनी सांगितलं. यात महाराष्ट्रातलं दिघी, उत्तराखंडमधलं खुरपिया, बिहारमधलं गया, पंजाबमध्ये राजपुरा-पतियाला, तेलंगणामध्ये जहीराबाद, आंध्र प्रदेशामधले ओरवकल आणि कोप्परती, केरळमध्ये पलक्कड, राजस्थानमधले जोधपूर-पाली आणि उत्तर प्रदेशातले आग्रा आणि प्रयागराज या प्रकल्पांचा समावेश आहे.

आर्थिक व्यवहार मंत्रिमंडळ समितीनं दोन नवे रेल्वे मार्ग आणि एका मल्टी ट्रॅकिंग प्रकल्पासाठी ६ हजार ४५६ कोटी रुपयांच्या निधीला आज मंजुरी दिली. नवीन प्रकल्पांमुळे एक हजार ३०० खेडी जोडली जाणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

कृषी क्षेत्रातल्या पायाभूत सेवांना बळकट करण्यासाठी एआयएफ अर्थात कृषी पायाभूत सुविधा निधीचा विस्तार करण्याचा निर्णयही केंद्रीय मंत्रिमंडळानं घेतला. कृषी प्रकल्पांची व्याप्ती वाढवणं आणि कृषी पायाभूत सेवा परिसंस्था मजबूत करणं हा यामागचा हेतू आहे.

देशातल्या २३४ शहरांमधे ७३० एफएम प्रसारण वाहिन्यांच्या लिलावालाही मंत्रिमंडळानं मंजुरी दिली. यात महाराष्ट्रातल्या ११ शहरांचा समावेश आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री जनधन योजनेला आज 'एक दशक' पूर्ण झालं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २८ ऑगस्ट २०१४ रोजी, ही योजना सुरु केली होती. या योजनेअंतर्गत आतापर्यंत ५३ कोटी जनधन खाती उघडण्यात आली आहेत. या योजनेच्या दशकपूर्ती निमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी लाभार्थ्यांचं अभिनंदन केलं असून ही योजना यशस्वी केल्याबद्दल त्यांचे आभार मानले आहेत. आर्थिक समावेशन आणि महिला – युवकांचं, सक्षमीकरणाच्या प्रयत्नांमधे जनधन योजनेचा महत्त्वाचा वाटा असल्याचं, मोदी यांनी समाजमाध्यमावर म्हटलं आहे.

हा जगातला सर्वात मोठा 'वित्तीय समावेशन उपक्रम' असून, अर्थ मंत्रालय, यामाध्यमातून उपेक्षित आणि आर्थिकदृष्ट्या मागास घटकांना आधार देण्याचा प्रयत्न सातत्यानं करत असल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

देशातलं रस्ते अपघातांचं प्रमाण कमी करण्यासाठी सरकार प्रयत्नशील असून अपघात टळावे यासाठी सरकार मोठी पावलं उचलत आहे, असं रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज सांगितलं. नवी दिल्ली इथं FICCI रस्ते सुरक्षा पुरस्कार आणि कॉँनक्लेव्ह २०२४ मधे ते बोलत होते.

**<><><><><>**

मालवण राजकोट इथं कोसळलेल्या पुतळ्याची पाहणी करण्यासाठी आज तिथं गेलेले शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आदित्य ठाकरे आणि भाजपा नेते नारायण राणे यांच्या समर्थकांनी एकमेकांवर दगडफेक केली. यात एक पोलीस आणि एक महिला असे दोघे जखमी झाले. पुतळा पडल्याच्या निषेधार्थ महाविकास आघाडीनं आज पुकारलेल्या मालवण बंदला शंभर टक्के प्रतिसाद मिळाला.

पुतळा पडल्याच्या निषेधार्थ महाविकास आघाडी येत्या रविवारी मुंबईत गेट वे ऑफ इंडिया इथं आंदोलन करणार आहे. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मुंबईत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. यावेळी ज्येष्ठ नेते शरद पवार आणि कॉँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले उपस्थित होते.

दरम्यान, या घटनेला विरोधकांनी निवडणुकीच्या चष्म्यातून पाहू नये, असं आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केलं आहे.

**<><><><><>**

बिहारमध्ये गुरु पद्मसंभवांच्या यांच्या योगदानाविषयीच्या दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेला आजपासून राजगीर इथल्या नवा नालंदा महाविहार इथं सुरुवात झाली. बौद्ध धर्मातील अहिंसा आणि शांतता हे दोन स्तंभ सर्व प्रकारच्या समस्यांवर उपाय आहेत, असं बिहारचे राज्यपाल राजेंद्र विश्वनाथ आर्लेकर यांनी यावेळी सांगितलं.

या परिषदेत नेपाळ, तिबेट, श्रीलंका, भूतान आणि इतर देशांतील ५० हून अधिक विद्वान आणि भिक्षू सहभागी होत आहेत. गुरु पद्मसंभव यांनी तिबेट, नेपाळ आणि भूतानसह हिमालयीन प्रदेशात बौद्ध धर्माचा मोठ्या प्रमाणात विस्तार केला.

**<><><><><>**

लातूर जिल्ह्यात उदगीर इथं नगरपरिषदेनं उभारलेल्या बुद्ध विहाराचं उद्घाटन येत्या ४ सप्टेंबरला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत होणार आहे. उदगीरमधे तळवेस इथं बुध्द विहाराचं बांधकाम केलं आहे. कर्नाटकातल्या कलबुर्गी इथल्या बुध्द विहाराची ही प्रतिकृती आहे.

**<><><><><>**

देशभरातल्या शिक्षण पद्धतीत अमूलाग्र सुधारणांच्या दृष्टीनं राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ला प्रतिसाद मिळत असल्याचं महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी म्हटलं आहे. ते आज पुण्यात सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाच्या पहिल्या पदवीप्रदान समारंभात बोलत होते. बाजारपेठेतल्या गरजा, मागणीशी सुसंगता असणारा अभ्यासक्रम असणं आवश्यक आहे, असं ते म्हणाले.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाशी सुसंगत बाबी लागू करण्याचा सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाचा प्रयत्न प्रशंसनीय असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले.

**<><><><><>**

शेअर बाजारात आज चढ उतार पाहायला मिळाले. दिवसअखेर मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज ७३ अंकांची वाढ झाली आणि तो ८१ हजार ७८६ अंकांवर बंद झाला. तर राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीमध्ये ३५ अंकांची वाढ होऊन तो २५ हजार ५२ अंकांवर बंद झाला. निफ्टीने आज सत्रातला सार्वकालिक उच्चांक गाठला.

**<><><><><>**

लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्रातल्या काही कंपन्यांमध्ये गुंतवणूक करताना गुंतवणूकदारांनी सावध राहावं, असा इशारा सेबी अर्थात भारतीय रोखे आणि विनिमय मंडळानं पत्रकाद्वारे दिला आहे. स्टॉक एक्सचेंजमधल्या लघु आणि मध्यम उद्योग विभागात नोंदणी झाल्यानंतर या कंपन्या आपल्या कारभाराचं खोटं, सकारात्मक चित्र उभं करतात, त्यासाठी विविध घोषणा करून गुंतवणूकदारांना आपल्याकडे आकर्षित करून घेतात, अशा कंपन्यांविरुद्ध सेबीनं यापूर्वी आदेश जारी केले असून त्यांची यादी सेबीच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. गुंतवणूकदारांनी अशा कंपन्यांपासून सावध आणि दक्ष राहावं, समाजमाध्यमावरच्या अविश्वासार्ह पोस्ट आणि अफवांवर विश्वास ठेवून गुंतवणूक करू नये, असं आवाहन सेबीनं केलं आहे.

**<><><><><>**

दिव्यांगांसाठीच्या पॅरालिंपिक स्पर्धेला आजपासून पॅरीस इथं सुरुवात होत आहे. या स्पर्धा येत्या ८ सप्टेंबर पर्यंत चालणार आहेत. एकूण २२ क्रीडाप्रकारांचा स्पर्धेत समावेश असून त्यातल्या १२ खेळांमधे भारताचा ८४ जणांचा संघ सहभागी होणार आहे.

**<><><><><>**

भारत आर्थिक महासत्ता बनण्याच्या मार्गावर असल्याचं प्रतिपादन राज्यसभेचे उपाध्यक्ष हरिवंश यांनी केलं आहे. ते आज वर्ध्यात महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात आयोजित 'भावी जगात भारत' या विषयावर व्याख्यान देत होते. २०४७ पर्यंत भारत विकसित करण्याचा संकल्प पूर्ण करण्यासाठी आपल्याला साडेतेराच्या आर्थिक विकास दरानं पुढे जावं लागेल. यामुळे आपण केवळ आर्थिकदृष्ट्या समृद्ध होणार नाही, तर आपल्या सर्व समस्याही दूर होतील, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

काँग्रेसच्या निवड समितीचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ नेते मधुसूदन मिस्त्री हे महाराष्ट्राच्या दौऱ्यावर असून त्यांनी आज राज्यातल्या वरिष्ठ नेत्यांशी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगानं सविस्तर चर्चा केली. या बैठकीला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात हे देखील उपस्थित होते.

**<><><><><>**

ज्येष्ठ मराठी अभिनेत्री सुहासिनी देशपांडे यांच्या पार्थिवावर आज पुण्याच्या वैकुंठधाम स्मशानभूमीत अंतिम संस्कार करण्यात आले. काल पुण्यात निधन झालं. त्या ८१ वर्षांच्या होत्या. नाटक, चित्रपट, मालिका या सर्व क्षेत्रात आपल्या समर्थ अभिनयानं त्यांनी अनेक दशकं प्रेक्षकांच्या मनात अढळ स्थान निर्माण केलं होतं.

**<><><><><>**

१७व्या आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र आणि खगोलभौतिकशास्त्र ऑलिम्पियाड स्पर्धेत भारताच्या चमूनं १ सुवर्ण आणि ४ रौप्यपदकांना गवसणी घातली आहे. १७ ते २६ ऑगस्टदरम्यान ब्राझिलची राजधानी रिओ दी जानेरो इथं झालेल्या या स्पर्धेत बंगळुरूचा दक्ष तयालिया यानं सुवर्ण, तर पुण्याचे आयुष कुठारी आणि सानिध्य सराफ, हैदराबादचा बानीब्रत माजी आणि बिहारचा पाणिनी या चौघांनी रौप्यपदकाची कमाई केली. पदकतालिकेत भारत आठव्या स्थानी राहिला. इंदोरच्या भारतीय तंत्रज्ञान संस्थेचे प्राध्यापक भार्गव वैद्य आणि मुंबईच्या होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्र, टाटा मूलभूत संशोधन संस्थेचे प्रितेश रणदिवे यांनी या चमूचं नेतृत्व केलं.